# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**शनिवार, दि.२१/०९/२०१९**

---

## “ महिलेचा विनयभंग.”

**पोलीस ठाणे, बेंबळी:** भैरवनाथ भाऊराव कदम रा. धारुर, ता. उस्मानाबाद याने दि. २०.०९.२०१९ रोजी ११.०० वा.सु. एका महिलेचा हात पकडुन ओढले. तसेच तिला लज्जा वाटेल असे वर्तन करुन विनयभंग केला. अशा मजकुराच्या पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे भा.दं.वि. कलम ३५४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “पैशांसाठी सासरच्यांकडुन सुनेचा छळ.”

**पोलीस ठाणे, भुम:** १) कौस्तुभ रामचंद्र बर्गे (पती) २) सुनिता रामचंद्र बर्गे (सासु) ३) रामचंद्र दत्तात्रय बर्गे (सासरा) सर्व रा. माळेगाव, ता.बारामती, जि.पुणे ४) किर्ती प्रविण परकाळे रा.अंजनगाव, ता.बारामती, जि.पुणे यांनी आपापसात संगणमत करुन दि. १५.०६.२०१४ ते दि. ०४.०८.२०१९ रोजीचे दरम्यान त्यांच्या सुनेस “माहेराहुन तुझ्या नवऱ्यास १ तोळयाची अंगठी व ॲटोमाबाईल्सचे दुकान टाकण्यासाठी ५०,०००/-रु. घेवुन ये.” म्हणुन अनेकदा शिवीगाळ करुन तिला शारीरिक व मानसीक त्रास दिला. तसेच तिला जिवे ठार मारण्याची धमकी देउुन घरातुन हाकलुन दिले. अशा मजकुराच्या सुनेच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, भुम येथे भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “ सोन्याचे दागिने, रक्कम व मोबाईल चोरीस.”

**पोलीस ठाणे, येरमाळा:** बाबुराव भगवान मोरे रा. सारोळा (मां), ता.वाशी हे दि. १९.०९.२०१९ रोजी १९.०० वा.सु. येरमाळा ते कळंब जाणाऱ्या रोडवर, मनुष्यबळ फाट्याजवळ त्यांची मोटारसायकल उभा करुन लघुशंकेस थांबले असता दोन मोटारसायकलवर आलेल्या चार अनोळखी पुरुषांनी बाबुराव मोरे यांच्या मोटारसायकलला लावलेली पिशवी त्यामधील रोख रक्कम ४०,०००/-रु., ५ ग्रॅम सोन्याची अंगठी किं.अं. १६,०००/-रु. व एक मोबाईल फोन किं.अं. ३,०००/-रु. असा एकुण ५९,०००/-रु. च्या मालासह चोरुन नेली. अशा मजकुराच्या बाबुराव मोरे यांच्या फिर्यादीवरुन वरील चार अनोळखी पुरुषांविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “प्रवासाचा बहाणा करुन टेम्पोचालकाचे पैसे चोरले.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** १) सुष्मा बापु चव्हाण रा.मुळेगाव (ह.मु. बोरामणी, ता.जि. सोलापुर) २) नमिता पिंटु पवार रा.येवती, ता.तुळजापूर (ह.मु.सोलापुर) ३) सुरेखा बाबु भोसले ४) शैला नाशी पवार दोघी रा.मुळेगाव तांडा, सोलापुर ह्या मकसुद अकबर अली (चालक) रा. मल्लो, पोस्ट येलो, पो.स्टे. पयाकपुर ता.जि.भैराईश राज्य उत्तर प्रदेश यांच्या आयशर टेम्पोमधुन प्रवास करत असतांना दि. २०.०९.२०१९ रोजी १२.३० वा.सु. गोलाई चौक नळदुर्ग ते दिल्ली दरबार हॉटेल नळदुर्ग दरम्यान सुष्मा बापु चव्हाण हिने मकसुद अकबर अली यांच्या खिशातील ५,५००/-रु. चोरले. त्यावेळी पैसे चोरल्याचे मकसुद अली यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी वरील महिलांकडे विचारपुस केली असता त्यांनी अरेरावीची भाषा केली. तसेच वरील महिलांनी मुकबार मुस्ताफा अहमद यांनापण हात दाखवुन त्यांच्या गाडीच्या डिकीमधुन काही रक्कम चोरल्याचे मकसुद अली यांना समजले. अशा मजकुराच्या मकसुद अली यांच्या फिर्यादीवरुन वरील चारही महिला आरोपींविरुध्द

पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“नदीतील मासे पकडण्याच्या कारणावरुन जबर मारहान.”**

**पोलीस ठाणे, परंडा:** १) बापु दत्तात्रय लोहार रा.हिवरा, ता.करमाळा व अन्य १-२ अनोळखी पुरुष हे दि. १३.०९.२०१९ रोजी ०८.३० वा.सु. कौडगाव, डोमगाव शिवारातील नदी पात्रात मासे पकडत होते. त्यावेळी सुनील पंडीत साबळे रा.डोमगाव, ता.परंडा यांनी “तुमच्याकडे मासे पकडण्याचा परवाना आहे का?” असे विचारले असता त्यांनी “तुला काय करायचे आहे.” असे म्हणुन सुनील साबळे यांना लाथा-बुक्यांनी, लोखंडी सळईने मारहान करुन त्यांचा उजवा पाय मोडला. अशा मजकुराच्या सुनील पंडीत साबळे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ३२६, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“किरकोळ कारणावरुन मारहान.”**

**पोलीस ठाणे, वाशी:** मोतीराम वामन आहिरे रा. आदर्श नगर, वाशी, ता.वाशी यांना त्यांच्याच गावातील १) बबन बलभीम सुकाळे २) स्वप्नील बबन सुकाळे ३) निखील बबन सुकाळे यांनी दि. १५.०९.२०१९ रोजी ०८.०० वा.सु. भिमनगर, वाशी येथे आपापसात संगणमत करुन “तु माझ्याकडे बघुन का थुंकलास?” असे म्हणुन शिवीगाळ करुन लाथा-बुक्यांनी मारहान केली. तसेच त्यांच्या डोळयावर ठोसा मारुन जखमी केले, व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या मोतीराम वामन आहिरे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, वाशी येथे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २१.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

**“ मौजे ईट: पैशाच्या कारणावरुन मारहान.”**

**पोलीस ठाणे, वाशी:** १) मोहन दगडु भोसले २) जहीरत्या दगडु भोसले ३) गारव्या जहीरत्या भोसले ४) कैलासी जहीरत्या भोसले सर्व रा. ईट, ता.भुम यांनी दि. २०.०९.२०१९ रोजी ११.०० वा.सु. मौजे ईट येथे आपापसात संगणमत करुन जितेंद्र बाबुशा भोसले रा. घाटपिंप्री, ता.वाशी यांना “तुला दिलेले पैसे परत का देत नाही?” असे म्हणुन शिवीगाळ केली व लाथाबुकयांनी मारहान करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तर जहीरत्या भोसले याने त्यांच्या तोंडावर दगड मारुन जखमी केले. अशा मजकुराच्या जितेंद्र भोसले यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे वाशी येथे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“रहदारीस अडथळा होईल अशा रितीने वाहन उभा करणाऱ्यावर कारवाई.”**

**पोलीस ठाणे, कळंब :** उत्रेश्वर प्रकाश करंजकर रा.कळंब हे दि. २१.०९.२०१९ रोजी १२.०० वा.सु. पंचायत समिती कार्यालयासमोर, कळंब येथे ॲपे रीक्षा क्र. एम.एच. २५ पी. ५४०५ यामध्ये पत्रे, लोखंडी पाईप फाळक्याच्या बाहेर भरुन रहदारीस अडथळा होईल अशा रितीने वाहतुक करीत असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आला. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे भा.दं.वि. कलम २८३ प्रमाणे गुन्हा दि. २१.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“बेदरकारपणे वाहन चालवणाऱ्यावर कारवाई.”**

**पोलीस ठाणे, कळंब :** संतोष सुरेश पांचाळ रा. गांधी नगर, कळंब हा दि. २०.०९.२०१९ रोजी १२.४० वा.सु. पंचायत समिती कार्यालयासमोर, कळंब येथे मोटारसायकल क्र. एम.एच. २५ एस. ४७०५ ही भरधाव वेगात बेदरकारपणे चालवत असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आला. यावरुन त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे भा.दं.वि. कलम २७९ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "अवैध मद्य विक्री विरुध्द कारवाई"

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर):** १) सोमनाथ हरी दुधभाते रा.जेवळी, ता.लोहारा (ह.मु. इंगळे गल्ली, उस्मानाबाद) हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने राजा वाईन शॉपी, उस्मानाबाद येथुन विदेशी दारुच्या बाटल्या किं.अं. १३,८००/-रु. चा माल घेवुन जात असतांना दि. २०.०९.२०१९ रोजी २०.४० वा.सु. सुर्यकांत पेट्रोल, पंपा समोर, उस्मानाबाद येथे स्थानिक गुन्हे शाखा, उस्मानाबाद यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन सोमनाथ हरी दुधभाते व राजा वाईन शॉपीचे माल यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे म.दा.का. कलम ६५ (ई) (अ), ८१, ८३ प्रमाणे गुन्हा दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## "मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: १११ कारवाया."

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. २०/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार १११ कारवाया केल्या असुन त्यातुन २२,७०० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

पोलीस निरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद